**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१**

Web : www.dhepune.gov.in | E-mail : budget.dhepune@nic.in
फोन नं.: ०२०/२६१२२११९, २६१३०६२७ | फॅक्स नं : ०२०/२६११११५३

क्रमांक: अर्थसं २१-२२/जमा-खर्च/ताळमेळ/लेखा-२, / 7741 | दिनांक : ०२/०७/२०२१
- 2 JUL 2021

**अत्यंत महत्वाचे / परिपत्रक**

प्रति,

संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व
विभागीय सहसंचालक (उ.शि.) कार्यालये/ लेखाधिकारी कार्यालये,
शासकीय वाणिज्य / विज्ञान / कला / विधी/ अध्यापक महाविद्यालये,
शासकीय न्याय सहाय्यक विज्ञान संस्था,
भारतीय प्रशासकीय सेवापुर्व प्रशिक्षण केंद्रे,
शासकीय आ.दृ.मा. वसतिगृहे.

**विषय - शासनखाती जमा करण्यात येणा-या रकमांचा व खर्चाचा दरमहा ताळमेळ घेणेबाबत..**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते कि, आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये शासन खाती जमा करण्यात येणा-या रकमा व विभागांकडील खर्चाचे संबंधित कोषागार कार्यालये, मा. महालेखाकार कार्यालय, मुंबई, मा. महालेखापाल कार्यालय, नागपुर तसेच मा. अधिदान व लेखा कार्यालय (P.A.O.) मुंबई या कार्यालयांसोबत जमा व खर्चाचा ताळमेळ घेण्यात यावा. तसेच महालेखाकार कार्यालयाकडुन लेखापरीक्षण करण्यात आल्यास उक्त ताळमेळासंबंधीत अभिलेख उपलब्ध करुन देण्यात यावे.

संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी (डी.डी.ओ.) यांना कळविण्यात येते की, दरमहा शासनास / महालेखाकार कार्यालय यांना जमा व खर्चाच्या रकमेबाबत ताळमेळाची माहिती सादर करताना तफावती / त्रुटी आढळुन येत असल्याने प्रत्यक्ष ताळमेळाची अचुक माहिती सादर करता येत नाही. तथापि, सर्व विभाग प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी (डी.डी.ओ.) यांना प्रत्येक आर्थिक वर्षातील शासन खाती प्रत्यक्ष जमा व विभागांकडील प्रत्यक्ष खर्चाचे ताळमेळ घेणेबाबत खालील प्रमाणे कळविण्यात येते.

१. **शासनखाती जमा रकमेचा ताळमेळ -**

आपल्या कार्यालयाकडुन प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये शासनखाती प्रत्यक्ष जमा करण्यात येत असलेल्या रकमेचा लेखाशीर्षनिहाय दरमहा ताळमेळ संबंधीत कोषागारासोबत व संबंधीत महालेखापाल कार्यालय मुंबई/नागपुर व लेखा व अधिदान कार्यालय मुंबई यांचेशी घेण्यात यावा. तसेच काही तफावती/त्रुटी असल्यास त्याबाबची उचित कार्यवाही करण्यात यावी.

२. **विभागांकडील खर्चाचा ताळमेळ -**

आपल्या कार्यालयाकडुन प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेल्या लेखाशीर्षनिहाय तसेच उद्दिष्ट निहाय खर्चाचा ताळमेळ दरमहा ऑनलाईन https://cag.gov.in/ae/Mumbai/en या संकेतस्थळावरुन मा. प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी) कार्यालय मुंबई, व https://cag.gov.in/ae/Nagpur/en या संकेतस्थळावरुन मा. प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी) कार्यालय नागपुर या कार्यालयांसोबत घेण्यात यावा. तसेच मा. लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई या कार्यालयांसोबत खर्चाचा ताळमेळ प्रत्यक्ष जावुन किंवा लेखा व अधिदान कार्यालयाने ऑनलाईन उपलब्ध करुन दिल्यास दरमहा घेण्यात यावा. सदर खर्चाचा ताळमेळाबाबत काही तफावती / त्रुटी असल्यास त्याबाबची उचित कार्यवाही करण्यात यावी.

३. **जी.पी.एफ. / डी.सी.पी.एस. बाबत जमा व खर्च रकमेचा ताळमेळ -**

आपल्या कार्यालयाकडुन प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये G.P.F. व D.C.P.S. बाबत जमा व खर्च करण्यात आलेल्या रकमेचा ताळमेळ संबंधित कोषागार कार्यालयासोबत दरमहा घेण्यात यावा. याबाबत काही तफावती / त्रुटी असल्यास त्याबाबची उचित कार्यवाही करण्यात यावी.

४. उपरोक्त बाबत ताळमेळ घेताना लेखाशीर्ष / उद्दिष्ट उचित आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यात यावी. जमा व खर्चाचे ताळमेळाबाबतचा अहवाल प्रत्येक तिमाहीला संचालनालयास सादर करण्यात यावा. जमा व खर्चाचे ताळमेळाबाबतचे काम विहित कालावधीत व अचुकपणे पुर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच सदरबाबत विलंब होणार नाही याची जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी (डी.डी.ओ.) यांची राहील.

५. संचालनालयास सादर करण्यात येत असणा-या जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकासोबत तसेच अंतिम खर्च अहवालासोबत पुर्ण वर्षाचे जमा व खर्चाचा ताळमेळ अहवाल सादर करण्यात यावा.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक,(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

प्रत - माहिती तथा कार्यवाहीस्तव सादर.

मा. प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२ .